


**पुणे : क्विक हील फाउंडेशनने संगती या स्वयंसेवी संस्थेला रुग्णवाहिका भेट दिली.**

# ‘क्विक हील’कडून रुग्णवाहिका भेट

**पुणे :** क्विक हील टेक्नॉलॉजीजचा सीएसआर उपक्रम क्विक हील फाउंडेशनने संगती या संस्थेला रुग्णवाहिका भेट दिली आहे. राज्यातील मोखाडा येथील आदिवासींचा विकास, शिक्षण आणि आरोग्यासाठी संगती ही संस्था काम करते. रुग्णवाहिका उपलब्ध झाल्यामुळे या भागातील पायाभूत आरोग्य सेवासुविधांमध्ये सुधारणा होतील. टेक्नॉलॉजीजचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कैलाश काटकर म्हणाले, ‘‘काही विशिष्ट मूल्ये डोळ्यासमोर ठेऊन क्विक हील टेक्नॉलॉजीज समाजासाठी योगदान देण्यासाठी वचनबद्ध आहे. मोखाड्यामधील आदिवासी लोकांच्या विकासासाठी संगती स्वयंसेवी संस्थेने अतिशय चांगले काम केले आहे.’’